MHAH160008382019

**<u>निशाणी २७ खालील आदेश</u>**
**( सुमन मेंगाळ वि. संजय मेंगाळ )**

प्रस्तुत मुळ अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये दाखल केलेला आहे. अर्ज निशाणी २७ हा सामनेवाला नं. ४ याने दाखल करुन विनंती केली आहे की, अर्जातील सामनेवाला नं. १ हा परागंदा आहे. अर्जदाराने निशाणी १७ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सामनेवाला नं. २ ते ५ यांनी सामनेवाला नं. १ याचा शोध घेऊनही तो मिळाला नाही तसेच इतर सामनेवाला यांना त्यांचे घरगुती कामांचे अडचणीमुळे ते येऊ न शकलेने व माहिती न मिळाल्याने क्रॉस घेता आली नाही. त्यामुळे सामनेवाले विरुध्द नो–क्रॉस चा हुकूम झालेला आहे. तसेच अर्जदाराने दिनांक २०.०६.२०२३ रोजी पुरावा बंद केलेला आहे. सामनेवाला यांना पुरावा देणे आहे परंतु अर्जदाराची क्रॉस होणे आवश्यक आहे. सबब अर्जदाराची क्रॉस घेण्याकरीता सामनेवालाविरुध्द झालेला नो–क्रॉसचा आदेश रद्द करुन क्रॉस घेणेची परवानगी मिळावी अशी विनंती सामनेवाला नं. ४ यांनी केली आहे.

३. अर्जदाराने तिचे म्हणणे दाखल करुन कळविले आहे की, सामनेवाला नं. ४ यांनी दिलेला अर्ज खरा व बरोबर नाही. सबब, अर्ज रद्द करण्यात यावा. सामनेवाला नं. ४ हा १ ते दिड वर्षानंतर नो–क्रॉसचा आदेश रद्द करुन मागत आहे. वास्तविक अर्जाचे कामकाज लांबविण्यासाठी सदरचा अर्ज दिला आहे. सबब, हेवी कॉस्ट रुपये ५,०००/– करण्यात यावी अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

४. मुळ अर्ज पाहिला. सामनेवाला नं. ४ यांनी न्यायप्रविष्ठ केलेला अर्ज अभ्यासला. सामनेवाला यांनी निशाणी १७ वर अर्जदाराचा उलटतपास

घेतला नाही म्हणुन त्यांचेविरुध्द उलटतपास नाही असा झालेला आहे. सामनेवाला नं. ४ यांनी अर्जदाराचा उलटतपास घेणेसाठी उलटतपास नाही चा आदेश रद्द करण्याची विनंती प्रस्तुत अर्ज दाखल करुन केली आहे. मुळ अर्जाचे स्वरुप लक्षात घेता अर्जाच्या योग्य त्या निर्गतीकरिता अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी सामनेवाला यांना देणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचीत आहे. परंतु उलटतपासाकामी झालेला उशीर पाहता योग्य ती खर्चाची रक्कम सामनेवालावर लादणेही गरजेचे आहे. परिणामी खालील आदेश –

## आदेश

अर्ज निशाणी २७ सामनेवाला नं. ४ यांनी खर्चाची रक्कम रुपये १,०००/– अर्जदारास देण्याच्या अटीवर त्यांचेविरुध्द झालेला निशाणी १७ खालील उलटतपास नाही चा आदेश रद्द करण्यात येतो.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2024.07.05 17:41:29 +0530

दिनांक ०४.०७.२०२४
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,
**अकोले**